श्री संत संताजी महाराज जगनाडे यांची

अभंगगाथा

संपादक आणि भावानुवाद

प्रा. समीर रामचंद्र वैरागी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

श्री संत संताजी महाराज जगनाडे

यांची

अभंगगाथा

* संपादक, भावानुवाद *

प्रा. समीर रामचंद्र वैरागी

श्री संत संताजी महाराज जगनाडे यांची अभंगगाथा

संपादक, भावानुवाद: प्रा. समीर रामचंद्र वैरागी
पत्ता : स्नेह ब – १७, पोंदार रुग्णालयासमोर, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, वरळी, मुंबई – ४०००३०.

चलभाष क्रमांक : ९९८७४६६४६७

ई-टपाल पत्ता : Sameer.vairagi@gmail.com

ISBN Number- 978-93-345-2098-9

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : १८ ऑक्टोबर २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- प्रा. समीर रामचंद्र वैरागी ९९८७४६६४६७)

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

प्रा. समीर रामचंद्र वैरागी,

सहायक प्राध्यापक आणि
विभागप्रमुख(मराठी),

राजपत्रित अधिकारी(म.शि.से.), गट -अ,

महाराष्ट्र शासनाचे इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी(पूर्व),

मुंबई - ४०००६०.

शिक्षण : एम.ए., बी.एड.,
एम.फिल.,
नेट(जेआरएफ), सेट,
वृत्तपत्रपदविका,
भगवद्गीता पदविका,
मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम,
भारतीय ज्ञान परंपरा प्रमाणपत्र अभ्यासक्रम.

संत संताजी जगनाडे समाधी मंदिर, सुदुंबरे

संत संताजी महाराज जगनाडे

वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत 'श्री विठ्ठल'



संत संताजी महाराज जगनाडे

संत तुकाराम आणि चौदा टाळकरी

संत संताजी महाराज जगनाडे

अनुक्रमणिका

१. संत संताजी जगनाडे : व्यक्तित्व आणि कवित्व
२. श्री संत संताजी महाराज जगनाडे यांची अभंगगाथा
अनुक्रमणिका
अभंगावली
३. संत संताजी जगनाडे महाराज विरचित अभंगांचा भावार्थ
संदर्भ ग्रंथसूची
परिशिष्ट्ये
१. संत श्री संताजी महाराज जगनाडे यांच्या जीवनाचा घटनाक्रम (काळपट)
२. श्री संत संताजी महाराज जगनाडे यांच्या आरती
३. श्री संत संताजी महाराज जगनाडे यांचे हस्ताक्षर

संत संताजी जगनाडे : व्यक्तित्व आणि कवित्व

❖ प्रास्ताविक:

मध्ययुगीन कालखंडात भक्ती चळवळी संपूर्ण भारतभर निर्माण झाल्या. मध्ययुगात महाराष्ट्रात भागवत(वारकरी) संप्रदायप्रणित भक्ती परंपरेत अनेक अठरापगड जातीतील संत निर्माण झाले.महाराष्ट्रीय समाजात आध्यात्मिक समता, मोक्षिकाधिष्ठीत लोकोध्दार ही जीवनमूल्ये प्रस्थापित करण्याचे कार्य वारकरी संतांनी केले. आजचा सर्वच बाबतीत प्रागतिक दिसणारा पुरोगामी विचारांचा महाराष्ट्र हीच संत साहित्याची सामाजिक फलश्रुती आहे. प्रस्तुत शोधनिबंधात सतराव्या शतकातील थोर परंतु उपेक्षित राहिलेला मराठी संतकवी संताजी महाराज जगनाडे ह्यांचे व्यक्तित्व, कवित्व आणि अभंगातील तत्त्वज्ञान प्रातिनिधिक रूपाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

❖ संत संताजी महाराज जगनाडे: व्यक्तित्व

संताजी महाराज जगनाडे (इ.स.१६२४ ते इ.स.१६८८) ह्यांचा जन्म ८ डिसेंबर १६२४ (श्रावण शुद्ध नागपंचमी शके १७०२) मध्ये पुणे जिल्ह्यात खेड तालुक्यातील चाकण ह्या गावी झाला. नंतर त्यांनी आपल्या आजोळी सुदुंबरे ह्या ठिकाणी वास्तव्य केले.

त्यांच्या वडिलांचे नाव विठोबा तर आईचे नाव मथाबाई असे होते. वडील आणि आई विठ्ठलभक्त असल्याने संताजींवर बालपणापासून धार्मिक संस्कार झाले. कीर्तनाला, भजनाला जाण्याची सवय संताजींना लागली. इ.स.१६२८ ते इ.स.१६३१ ह्या वर्षांमध्ये महाराष्ट्रात पडलेल्या भयावह दुष्काळाचा प्रभाव संताजींच्या बालमनावर पडला. तेली यातीत जन्म झाल्याने संताजींनी हिशोब करण्याइतपत आणि लिहिता-वाचता येईल इतके शिक्षण घेतले होते. तत्कालीन समाजरुढीनुसार संताजींचा विवाह वयाच्या बाराव्या वर्षी (इ.स.१६३५) यमुनाबाई ह्यांच्या बरोबर झाला. लहानपणापासून धार्मिक संस्कार असल्याने त्यांचे सामाजिक कार्यात जास्त लक्ष होते. वयाच्या सोळाव्या वर्षी कीर्तनाच्या निमित्ताने चाकणच्या चक्रेश्वर मंदिरात जानेवारी १६४० मध्ये संताजींची भेट संत तुकारामांबरोबर झाली आणि त्यांच्या जीवनाला सकारात्मक कलाटणी मिळाली. त्या काळी संत तुकारामांचे समाजाला कीर्तन, अभंग आदी माध्यमाद्वारे शिकवण देण्याचे कार्य चालू होते. संत तुकारामांची कीर्ती महाराष्ट्रात सर्वदूर पसरली होती. तुकाराम महाराजांची कीर्तने, भक्ती यांनी प्रभावित होऊन संताजींनी संत तुकारामांचे शिष्यत्व पत्करले. संत तुकाराम हे संताजी महाराजांचे आध्यात्मिक गुरु होते. संत तुकाराम ह्यांच्या कीर्तनसेवेत संताजीचा समावेश चढत्या क्रमाने टाळकरी, धृपदे, लेखनिक, शिष्य असा होत गेला.

संत तुकाराम महाराजांचा सहवास प्राप्त झाल्यानंतर संताजी तुकाराम महाराजांच्या प्रसिद्ध चौदा टाळकऱ्यांपैकी एक झाले. तब्बल सोळा वर्षाचा संत तुकारामांचा सहवास संताजींना लाभला. योगायोग म्हणजे ह्या दोघांच्या वयात सोळा वर्षाचेच अंतर होते. 'श्रीभक्तलीलामृत' ह्या ग्रंथात महिपती ताहराबादकर तुकाराम-संताजी ह्यांच्या संपर्काबाबत उल्लेख करतात.

"तुकयाच्या संगे वैष्णव जन।
श्रेष्ठ निधडे असती कोण कोण।।
संताजी तेली बहु प्रेमळ।
अभंग लिहित बसे जवळ।।"

संत तुकारामांच्या अभंगाचे लेखनिक म्हणून संताजी जगनाडे ह्यांनी केलेले कार्य मराठी साहित्य इतिहासात अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. तत्कालीन धर्ममार्तंडांनी तुकारामांची अभंगगाथा इंद्रायणी नदीत बुडवून टाकल्यानंतर संताजी महाराजांनी तुकोबांचे सर्व अभंग मुखोद्गत असल्याने त्यांनी ते अभंग पुन्हा लिहून काढले. तुकारामांच्या पश्चात पन्नास वर्ष संताजींनी तुकाराम अभंगगाथा जपली. संताजींचा मुलगा बाळोजी ह्यांनी देखील ह्या अभंगगाथेत फार मोठे लिखाण केले आहे. संत तुकारामांचे वंशज गोपाळबाबा मोरे ह्यांनी असे म्हटले आहे

"संताजी तेली बहु प्रेमळ।अभंग लिहित बसे जवळ।।

धन्य त्याचे भाग्य सबळ। संग सर्वकाळ तुक्याचा।।

संतु तुका जोडी। लावी ज्ञानाची गोडी।।"

संताजींच्या अथक प्रयत्नामुळेच तुकारामांची अभंगगाथा जिवंत राहू शकली. इ.स.१६६० मध्ये शाहिस्तेखानच्या मुघल सैन्याने चाकणवर हल्ला चढविला, तेव्हा संताजींनी जीव धोक्यात घालून सर्व संकटांवर मात करीत अभंग सुरक्षित ठेवले. संत संताजी महाराज जगनाडे आपला प्रपंच, व्यवसाय आणि सामाजिक कार्य यांचे उत्तम संतुलन साधत. संत तुकाराम महाराष्ट्रीय बहुजन जनतेला अध्यात्म व विज्ञान अभंग, कीर्तनातून समजावून सांगत त्यामुळे वैदिक कर्मकांड करणाऱ्या सनातन्यांचा विरोध व छळ तुकारामांना सहन करावा लागला. संताजी महाराज हे संत तुकारामांचे शिष्य आणि समर्थक असल्याने हा दाह त्यांच्याही वाट्याला आला. तुकाराम महाराजांवर तत्कालीन न्यायालयाने बहिष्कार टाकण्याचे आदेश दिले असताना, त्यांच्याबरोबर राहणारे संताजी हे एकमेव होते. मार्गशीर्ष वद्य त्रयोदशी इ.स.१६८८ ह्या वर्षी संताजी महाराजांचे देहावसान झाले. संत संताजी जगनाडे ह्यांना एकूण ६२ वर्षाचे आयुष्य लाभले. संताजींची समाधी पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात सुदुंबरे ह्या ठिकाणी आहे.

"मारवाडी मारवाडचा, गुजराती गुजरातचा

कानडी कानड्याचा, मुसलमान तो दिल्लीचा
मराठी महाराष्ट्राचा, कोकणी कोकणचा
पण संतु तुका या देशाचा”

असा आत्मचरित्रात्मक उल्लेख संताजीच्या अभंगकाव्यात आढळतो. संताजी महाराजांचे जीवन हे एक आदर्श जीवन होते. शिक्षणाचे महत्त्व, गुरुप्रति निष्ठा, प्रपंच-परमार्थ ह्यांचे संतुलन हे संताजींच्या जीवनाचे पैलू प्रामुख्याने जाणवतात. संताजींच्या जीवनातील सर्वात महान कार्य म्हणजे तुकाराम अभंग गाथेचे लेखन आणि रक्षण होय.

❖ संत संताजी महाराज जगनाडे : कवित्व

संताजी महाराज हे साक्षात्कारी संत तुकाराम ह्यांच्या प्रभावळीत निर्माण झालेले संत आहेत. तुकारामांच्या प्रभावातून संताजी महाराजांनी देखील काव्यलेखन केले आहे. संत संताजी महाराज जगनाडे ह्यांचे एकूण ८५ अभंग आज उपलब्ध आहेत. संताजींनी अभंगांसह 'शंकर दीपिका', 'योगाची वाट', 'निर्गुणाचं लावण्य' आणि 'तेलसिंधू' ह्या ग्रंथांचे लेखन केल्याचा उल्लेख आढळतो. त्यांची काव्यप्रतिभा विलक्षण होती. त्यांनी अभंगात व्यवसायनिष्ठ बोलीभाषेचे उपयोजन केले आहे. उदा.

“ आमुचा तो घाणा त्रिगुण तिळाचा।
नंदी जोडियेला मन पवनाचा।।

भक्ती हो भावाची लाट टाकीयीली।
शांती शीळा ठेविली विवेकावरी।। ”

तेली व्यवसायातील अनेक रूपके, उपमा, अलंकार आणि वास्तववादी चित्रण संताजी महाराजांच्या अभंगात आढळते. संताजींच्या अभंगात जगण्याचे तत्त्वज्ञान सहजपणे आविष्कृत झालेले आहे.

❖ संत संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंगांतील तत्त्वज्ञान :

संत संताजी महाराज ह्यांच्या आज उपलब्ध असलेल्या एकूण ८५ अभंगांची अभ्यासपूर्ण चिकित्सा केली असता अभंगातील व्यवसायनिष्ठ भाषा, आशय वैपुल्य, तात्त्विक विचार आणि जगण्याचे तत्त्वज्ञान आपणासमोर दृग्गोचार होते. संताजीचे अभंग वाचल्यानंतर त्यांच्यावरील संत तुकाराम ह्यांचा प्रभाव विलक्षण जाणवतो. संताजी अभंगात तुकारामांच्याच तत्त्वभूमिकेचा पुरस्कार करताना दिसतात. त्यांच्या अनेक अभंगात संत तुकारामांच्या पद्यपंक्तींच्या पुनर्प्रत्ययाचा आनंद प्राप्त होतो. महाकवी तुकारामांचे सानिध्य लाभले असल्याने संताजींचे अभंग त्याच मुशीतून निर्माण झालेले आहेत. तुकाराम आणि रामदास ह्यांचा सारख्या पूर्वसुरींच्या काव्याचा विलक्षण प्रभाव संताजी महाराज ह्यांच्या अभंगांवर जाणवतो. त्यांचे काही अभंग

तुकाराम–संताजी संवाद म्हणजेच गुरु-शिष्य संवाद ह्या स्वरूपाचे आहेत. त्यातून त्यांनी सद्गुरूच्या अनुनयाचे महत्त्व प्रतिपादले आहे. संत तुकाराम ह्यांच्या अनेक अभंग पंक्तींचे अनुकरण संताजींच्या अनेक अभंगात आढळते. उदा.

१.संतु म्हणे येथे पाहिजे जातीचे। येर गबाळाचे काम नाही।।

२.भरल्या वांचुनी कार्य सिद्धी नाही। शोधूनिया पाही संतु म्हणे।।

३.तुझिया सांगाती येते काही काही। कोणी येत नाही बाप आणि माई।।

सोयरा न येई बंधूही येईना।येईना रांडा पोरे अंतकाळी।।

४. माझिया जातीचा भेटो मज कोणी।

आवडिची धनी पुरवावया।।१।।

माझिया जातीचा मजशी मिळेल।

कळेल तो सर्व समाचार।।२।।

संतु म्हणे येथे पाहिजे जातीचे।

येर गबाळाचे काम नाही।।३।।

संताजींनी अभंगात क्षमा शांतीचे महत्त्व देखील प्रतिपादित केले आहे. त्यावर देखील तुकारामांचा प्रभाव जाणवतो. उदा.

क्षमा शांती जया नराचिये देही।दुष्ट तया काही करीत नाही।।

संत तुकारामांचा 'रांडापोरे' हा खास वैशिष्टपूर्ण शब्द संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंगात आलेला आहे.

संत संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंगात अनेक पूर्वसुरींचे उल्लेख आढळतात. उदा.वाल्मिकी, नरहरी सोनार, संत चोखामेळा, सावता माळी, गोरा कुंभार, संत रोहिदास, संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, कान्होपात्रा, नामदेव इत्यादी.संत तुकारामांप्रमाणे समर्थ रामदास स्वामींच्या साहित्याचा प्रभाव संताजींच्या अभंगांवर दिसतो.

उदा.

१. मनाला तो बोध रामदासाने केला। उपदेश दिला जगमाजी।।

२. संतु म्हणे तुम्ही मागे ते सरावे। मरावे परी कीर्ती रुपे उरावे।।

संताजी महाराजांनी अनेक अभंगात मुक्ती, मोक्ष, सायुज्यता ह्यांचे वर्णन केले आहे.उदा.

संतु म्हणे वनमाळी। चुकवा जन्माची ही पाळी।।

अध्यात्मक्षेत्रातील योगदानाबद्दल वाटणारा स्वाभिमान, खऱ्या भक्ताची लक्षणे, ब्रम्हज्ञान, भक्ती श्रेष्ठत्व, पौराणिक भक्तांची वर्णने, कृष्णलीला, विठ्ठलभक्ती, सगुण भक्तीचे वर्णन, विवेकाचे महत्त्व, सोहं ब्रह्मध्वनी, सद्गुरूच्या अनुनयाचे महत्त्व, जाती-विषमतेविरुद्धचा उद्वेग, जन्म-मरणाचा फेरा इत्यादी अनेक

विषयांचे तत्त्व विवेचन त्यांच्या अभंगात आढळते. अभंग म्हणजे काय? ह्या प्रश्नाचे विवेचन देखील त्यांच्या एका अभंगात आहे.

ज्याचा नोहे भंग। तोचि जाणावा अभंग।।

जो भंग पावत नाही तो अभंग असतो, असे संताजी म्हणतात.

संताजींच्या अनेक अभंगात आपल्या वारकरी संप्रदायातील पूर्वसुरींबद्दल अभिमान व्यक्त केला आहे. षड्रिपुंचे दमन करूनच भक्ताला सायुज्यता प्राप्त होऊ शकते असा विचार त्यांच्या अनेक अभंगांत व्यक्त केला आहे. त्यांनी काही अभंगात संसाराचे क्षणभंगुरत्व स्पष्ट करून भक्तीचे माहात्म्य प्रतिपादित केले आहे. आपले गुरू तुकारामांच्या कार्याबद्दल, कवित्वाबद्दल अभिमान काही अभंगांमधून संताजी व्यक्त करतात. भक्तिवाचून जीवन व्यर्थआहे, असे मत ते अभंगातून स्पष्ट करतात. संत एकनाथांच्या अभंगांतील 'एका जनार्दनी'प्रमाणे संताजी महाराजांनी काही अभंगात स्वगुरू तुकाराम महाराजांचा नामोल्लेख केलेला दिसतो. चित्रमय, रूपकात्मक आणि प्रतीकात्मक भाषा व्यवसायनिष्ठ शब्दांचे उपयोजन ही संताजी महाराजांच्या अभंगांची ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील.

❖ संत संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंगांचे तात्त्विक अंगाने वर्गीकरण (उदाहरणांसह)

१.आध्यात्मिक स्वाभिमान व्यक्त करणारे अभंग

उदा.

माझिया जातीचा मज भेटो कोणी। आवडीची धनी पुरवावया।।

|२.ब्रह्मज्ञान निरूपण व्यक्त करणारे अभंग

उदा.

१.तुजशी ते ब्रह्मज्ञान काय आहे। भक्तिमाय वसे पोटी।।

२.मजशी रे ब्रह्मज्ञान काही नाही। आपुल्या कृपेने होईल सर्व काही।।

३. भक्तीवर्णन/श्रेष्ठत्व व्यक्त करणारे अभंग

उदा.

१.मनोभक्तीची करुनी लाठ। गुरुकृपेचा वसविला काठ।।

२.भक्ती ते माऊली माझे नच पोटी। जाणे उठाउठी देवराया।।

४.क्षमा-शांतीचे महत्त्व व्यक्त करणारे अभंग

उदा.

क्षमाशांती जया नराचिये देही। दुष्ट तया काही करीत नाही ।।

५.विवेकाचे महत्त्व व्यक्त करणारे अभंग

उदा.

१.मनमत्सराचा धरूनी हात।बसविला विवेक कातरीचे आंत।।

२.सद्बुद्धीची वढ घेऊन। विवेक कातरीस बांधून।।

६.सगुण रुपाचे वर्णन करणारे अभंग

उदा.

सगुण हा घाणा घेऊनी बैसलों।तेली जन्मा आलो घाणा घ्याया।।

७.सद्गुरूच्या अनुनयाचे महत्त्व व्यक्त करणारे अभंग

उदा.

सद्गुरू वाचोनी दाखविना कोणी। संसार मोहनी पडली असे।।

८.जाती-विषमतेविरुद्धचा उद्वेग व्यक्त करणारे अभंग

उदा.

संतु म्हणे जाती दोनच त्या आहे |स्त्री आणि पुरुष शोधुनिया पाहे ||

९.षड्रिपुंच्या दमनाचे महत्त्व व्यक्त करणारे अभंग

उदा.

संतु म्हणे मत्सर। जगामध्ये महाचोर।।

१०.जन्म-मरणाच्या फेऱ्याचे वर्णन करणारे अभंग

उदा.

१.संसाराकरिता जन्म वाया गेला। काळ न्याया आला आवचीत।।

२.तिच जन्म मरणाचे मुळ।असे माझे सांगणे समुळ।।

❖ **संतांजींचे काही प्रातिनिधिक अभंग आणि त्यातील तत्त्वज्ञान:**

मन हे ओढाळ गुरु फार आहे। परधन परकामिनीकडे धावे।।

असेच हे मन राहिना हो स्थिर।नेहमी हुरहुर लागली असे।।

संतु म्हणे मन करा तुम्ही स्थिर। राऊळा अंगणी जाऊनिया।।

प्रस्तुत संताजींनी लिहिलेल्या अभंगात मनाचे वर्णन आढळते. मन हे ओढाळ असून त्याला आवर घालून स्थिर करणे आवश्यक आहे.मन परमेश्वराच्या भक्तिनेच स्थिर होऊ शकते, असा विचार वरील अभंगात संताजी महाराज मांडतात. ह्या अभंगांची जातकुळी बहिणाबाई चौधरींच्या' मन वढाय वढाय' ह्या कवितेच्या जातकुळीशी साम्य दाखवते.

सगुण हा घाणा घेऊनि बैसलो।

तेली जन्मा आलो घाणा घ्याया ।।१।।

नाही तर तुमची आमची एक जात।

कमी नाही त्यात आणु रेणु ।।२।।

संतु म्हणे जाती दोनच त्या आहे।

स्त्री आणि पुरुष शोधुनिया पाहे ।। ३ ।।

वरील अभंगात संताजी महाराज म्हणतात की, मी जरी एका विशिष्ट जातीत जन्माला आलो असलो, तरी सर्व माणसांची

जात आहे,ती म्हणजे मानव जात. आपण शोध घेऊन पाहिला तर, माणसांमध्ये दोनच जाती आहेत, त्या म्हणजे स्त्री आणि पुरुष. वरील अभंगात त्यांनी जातिभेदाच्या विरुद्ध आवाज उठविला आहे.

❖ **निष्कर्ष :**

संत संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंग आणि अभंगांतील तत्त्वज्ञानाची चिकित्सा

केल्यानंतर खालील निष्कर्ष काढता येतात.

१. संत संताजी महाराज जगनाडे हे मध्ययुगीन कालखंडातील संत तुकाराम ह्यांच्या प्रभावळीतील संत आहेत.

२. संताजी महाराजांच्या अभंगांची समीक्षकांनी नव्याने चिकित्सा केली पाहिजे.

३. संताजी महाराज ह्यांचे केवळ ८५ अभंगच आज उपलब्ध आहेत.

४. संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंगांची चित्रमयता, रूपकात्मक भाषा आणि

व्यवसायनिष्ठ भाषेतील शब्दांचे उपयोजन ही ठळक वैशिष्ट्ये जाणवतात.

५. संत संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंगांत त्यांची विलक्षण काव्यप्रतिभा जाणवते.

६. संताजींच्या अभंगांत जगण्याचे तत्त्वज्ञान सहजपणे आविष्कृत झालेले आहे.

७. आशयवैपुल्य, तात्त्विक विवेचन ही संताजींच्या अभंगांचे काही विशेष आहेत.

❖ **समारोप:**

एकूणच, संत संताजी महाराज जगनाडे हे मध्ययुगीन कालखंडातील एक अलौकिक,प्रतिभावंत संतकवी होते. भाष्यकाराते वाट पुसतच संताजींनी आपले काव्यलेखन केले आहे. आतापर्यंत त्यांनी केलेल्या काव्यलेखनाकडे मराठी समीक्षकांचे दुर्लक्ष झाले आहे. आज संताजींच्या काव्यप्रतिभेचा समीक्षकांनी नव्याने विचार करून त्यांचे अभंग विचार जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य करायला हवे.

****

श्री संत संताजी महाराज जगनाडे

यांची

अभंगगाथा

श्री संत संताजी महाराज जगनाडे यांची अभंगगाथेची अनुक्रमणिका

१. माझिया जातीचा मज भेटो कोणी ।

२. एकादशी दिनी संतु तुका वाणी ।

३. तुजशी ते ब्रह्मज्ञान कांही आहे ।

४. मजशी ते ब्रह्मज्ञान काही नाही ।

५. भक्ती ते माऊली माझे नच पोटी ।

६. मज मागे घाणा सांगे द्वारकेचा राणा ।

७. ज्याचा नोहे भंग तोची जाणावा अभंग ।

८. जन्मलो मी कुठे सांगतां नये कांही ।

९. सगुण हा घाणा घेऊनि बैसलो ।

१०. आमुचा तो घाणा त्रिगुण तिळाचा ।

११. देह क्षेत्र घाणा ऐका त्याच्या खुणा ।

१२. निंदक हा घाणा म्हणावा तो जरी ।

१३. निंदक हा घाणा म्हणावा तो जरी ।

१४. आणिक तो घाणा कोणता सादर ।

१५. घाण्याचा करकरा पुसलासी मज ।

१६. आशा, मनशा, तृषा, माया पाचरी चारी आणून ।

१७. भुलविले ह्यांनी भस्मासुर दैत्याशी ।

१८. हरिश्चंद्र राजाने पाचरी ओळखिल्या ।

१९. पाचरीनी प्रताप दाखविला शंकरा ।

२०. सद्गुरुवाचोनी दाखविना कोणी ।

२१. मनोभक्तीची करुनी लाट ।

२२. लाट उचलली जगामधी कोणी ।

२३. संतु तेलियाचे घाण्याची ती लाट ।

२४. सुदामाशी शक्ती काहीच नव्हती ।

२५. लाट माझी माता, लाट माझा पिता ।

२६. मन मोहाची करुनि खुटी ।

२७. खुटीने प्रताप कोणास दाखविला ।

२८. खुंटीने खुंटले घाणे ते घ्यायाचे ।

२९. खुंटीने प्रताप कैकयीस दाखविला ।

३०. अशिया खुंटीला धरू नये हाती ।

३१. मन झोंपेची करुनी शेंडी ।

३२. शेंडीच्या नादाने किती ते फसले ।

३३. आणिक ते शेंडी उभी हो कोणाची ।

३४. आणिक शेंडीने फसविले कोणा ।

३५. झोपेत असतांना दिले दान ।

३६. मनोसुविचारी करुनी कातर ।

३७. कातरीने कातरला दुष्टांचा तो गळा ।

३८. कातरीने कातरला दुःशासन कौरव ।

३९. कातरीने धरियले पांची पांडवांसी ।

४०. कातर मोडली कोणाचिये हाते ।

४१. मनशांतीची करुनी शिळ ।

४२. असा यमपाश लागला कोणासी ।

४३. मार्कंड ऋषींचे गळी पडता पाश ।

४४. क्षमा शांती जया नराचिये देहीं ।

४५. आशीच ही शिळा होते कोठे कोठे ।

४६. सुबुद्धीची वढ घेऊन ।

४७. अशीच ती ओढ कोठे ती ओढली ।

४८. आणिक ती ओढ पाहिली कोठे होती ।

४९. मारुतीस वढ दिली रामचंद्राने ।

५०. अंगदानी वढ दिली रावणाशी ।

५१. संसाराचे धरून जोखड ।

५२. नको नको जोखड म्हणे तुकावाणी ।

५३. प्रपंचाचे घेऊनि जोखड ।

५४. नको ते जोखड म्हणे गोरा कुंभार ।

५५. जोखडानी फसविले नारद मुनींसी ।

५६. मन मत्सराचा धरुनी हात ।

५७. मत्सर धरियला जगामध्ये कोणी ।

५८. आणिक मत्सर धरियला कोणी ।

५९. आणिक तो हात पाहिला कोठे ।

६०. आणिक तो हात पाहिला कोठे ।

६१. औट हाताचे बाहुले करून ।

६२. अशी ही बाहुली नाचवी पांडुरंग ।

६३. जन्मोनियां इहलोकी काय केले ।

६४. तुझिया सांगाती येते कांही कांही ।

६५. संसाराकरितां जन्म वाया गेला ।

६६. सावध व्हारे माझ्या जातीच्या तेल्यानो ।

६७. मन पवनाचे करुनी नंदी ।

६८. मन हे ओढाळ, गुरू फार आहे ।

६९. मनाला तो बोध रामदासांनी केला ।

७०. आम्ही तो ऐकतो संतुचा उपदेश ।

७१. पवन तो नंदी असे शंकराचा ।

७२. घेऊनिया घाणा तेल काढियले ।

७३. संतु म्हणे तेल आणीक कोण घेतो ।

७४. आणीक हे तेल घेतले कोणी ।

७५. आणिक ते तेल घेतले कोणी ।

७६. आणिक ते तेल घेतले कोणी ।

७७. संतु म्हणे मी जे सांगितले तुम्हां ।

७८. मारवाडी मारवाडचा, गुजर गुजरातचा ।

७९. देवासी अवतार, भक्तांसी संसार ।

८०. दोघे सारिखे सारिखे, विश्वनाथ विठ्ठल सखे ।

८१. एक कुडी वैष्णवाची ।

८२. आमची ती रूपे दिसतात दोन ।

८३. आम्ही तो विकितो तेल सौदा दोहीं ।

८४. धन्य धन्य संतु होशील तूं जाण ।

८५. जन्म व्यर्थ जातो हा घाणा नेणता ।

****

अभंगावली

अभंग क्र. १

माझिया जातीचा मज भेटो कोणी ।
आवडिची धनी पुरवावया ।।१।।
माझिया जातीचा मजशी मिळेल ।
कळेल तो सर्व समाचार ।।२।।
संतु म्हणे येथे पाहिजे जातीचे ।
येर गबाळाचे काम नाही ।।३।।

भावानुवाद : समान विचार, संस्कार आणि भक्तीभाव असलेल्या व्यक्तींचा सहवास म्हणजेच सत्संग साधनेच्या मार्गावर अत्यंत मोलाचा ठरतो. जेव्हा भावना आणि विचार जुळतात, तेव्हा परस्परांचा संवाद केवळ शब्दांपुरता मर्यादित न राहता आत्मिक समाधानाचा आणि प्रगतीचा मार्ग बनतो.

अभंग क्र. २

एकादशी दिनी संतु तुका वाणी ।
राऊळा आंगणी उभे होते ।। १ ।।
तेव्हा संतु तेली गेलासे दर्शना ।
पांडुरंग चरणा नमियेले ।।२।।
तेथुनी तो आला तुका जेथे होता ।

अलिँगन देता झाला त्याशी ।।३।।
तुका म्हणे संतु पुसतो तुजला ।
सांगतो तुजला संतु म्हणे ।।४।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्यातील नाते हे केवळ गुरु-शिष्याचे नसून एकात्म भक्तीभावाचे आणि अद्वैत प्रेमाचे प्रतीक आहे. संताजींनी तुकोबांच्या मुखातून पाझरणाऱ्या अमृतासारख्या अभंगांना लेखणीबद्ध करून जतन केले, आणि त्या प्रक्रियेत त्यांचे संपूर्ण अस्तित्वच विठ्ठलमय व तुकोबामय झाले होते.

अभंग क्र. ३

तुजशी ते ब्रम्हज्ञान कांही आहे ।
किंवा भक्तिमाय वसे पोटी ।। १ ।।
काय तुझ्या मार्गेँ कोण तुज सांगे ।
काय ते अभंग जाणितले ।।२।।
घाणाची घेऊनी बैसलासि बुधा ।
जन्म पाठिमागा का गेला ।।३।।
तुका म्हणे सर्व सांग तु मजला ।
सांगतो तुजला संतु म्हणे ।। ४।।

भावानुवाद : हा संवाद एका परिपक्व सद्गुरू आणि अधिकारी शिष्यामधील आध्यात्मिक आदानप्रदानाचे अप्रतिम दर्शन घडवतो. तुकाराम महाराज जेव्हा संताजींच्या अंतर्मनातील ब्रह्मज्ञान आणि अनुभूतीचा वेध घेतात, तेव्हा ते शिष्याच्या अंतःकरणातील साक्षात्काराला च मान्यता देत असतात.

अभंग क्र. ४

मजशी ते ब्रह्मज्ञान काही नाही ।
आपुल्या कृपेने होईल सर्वथाही ।। १ ।।
होईल मज आणि माझिया कुळांशी ।
पांडुरंग मुळाशी सर्व आहे ।। २।।
संतु म्हणे ब्रह्म ब्रह्मा सर्व जाणे ।
आपुले ते मन सुधारले ।। ३ ।।

भावानुवाद : संताजी महाराजांचा हा विचार वारकरी संप्रदायातील 'कृपासाध्य भक्ती' आणि शरणागतीचे तत्त्व अधोरेखित करतो. केवळ कोरड्या बौद्धिक कसरतीने किंवा अहंकाराने ब्रह्मज्ञान प्राप्त होत नाही, तर तिथे पांडुरंगाची अहेतुक कृपा आणि अंतःकरणाची शुद्धता अत्यंत आवश्यक असते.

अभंग क्र. ५

भक्ति ते माऊली माझे नच पोटी ।
जाणे उठा उठी देवराया ।। १ ।।
भक्ति या भावाची करुनिया लाट ।
आलिंगितो तीस रात्रंदिन ।। २ ।।
संतु म्हणे आपुल्या कृपेचा प्रसाद ।
द्यावा वारंवार मजलागी ।। ३ ।।

भावानुवाद : संताजी महाराजांचा हा भाव वारकरी संप्रदायातील 'वात्सल्यभाव' आणि अनन्य शरणागतीचे अत्यंत हळुवार रूप प्रकट करतो. विठ्ठलाला केवळ जगन्नियंता किंवा कठोर न्यायकर्ता न पाहता 'माऊली' रूपात अनुभवणे, हे या परंपरेचे मुख्य सौंदर्य आहे.

अभंग क्र. ६

मज मागे घाणा सांगे द्वारकेचा राणा ।
मज मागे संसार सांगे रुक्मिणीचा वर।।१।।
मज मागे घेवदेव सांगे रुक्मिणीचा राव ।
मज मागे निद्रा आहार सांगे उमा सारंगधर ।।२।।
किर्तीविणा कांही मागे ते राहिना ।
संतु सांगे खुणा तुकयाशी ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार वारकरी परंपरेतील 'कर्मयोग आणि सहज समाधी' या तत्त्वाचे मूर्तिमंत रूप आहे. संताजींनी परमार्थासाठी प्रपंचाचा त्याग केला नाही, तर प्रपंचालाच परमार्थाचे साधन बनवले. ते व्यवसायाने तेली होते; त्यामुळे घाणा फिरवण्यापासून ते दैनंदिन व्यवहारापर्यंतच्या प्रत्येक कृतीला त्यांनी भक्तीचे अधिष्ठान दिले.

अभंग क्र. ७

ज्याचा नोहे भंग तोची जाणावा अभंग ।
देह आपुला भंगतो माति मिळोनिया जातो ।।१।।
त्याचे होईनाच काही अंतरी शोधुनिया पाही ।
प्राण जातो यमपाशी दुःख होते ते मायेशी ।।२।।
संतु म्हणे असा अंभग गाइला ।
पुढे चालु केला देहावरी ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांनी येथे ‘अभंग’ या शब्दाची केलेली आध्यात्मिक मीमांसा अत्यंत मार्मिक आणि तात्त्विक उंची गाठणारी आहे. 'न भंगे ते अभंग'—ज्याचा कधीही लय किंवा विनाश होत नाही, तेच केवळ अभंग असू शकते. काव्याच्या छंदोरचनेपलीकडे जाऊन ते अभंगत्वाचा संबंध थेट आत्मतत्त्व आणि परमात्म्याशी जोडतात.

अभंग क्र. ८

जन्मलो मी कुठे सांगतां नये कांही ।
निरंजन निराकार आधार नव्हता ठाई ।।१।।
तेथे मी जन्मलो शोधुनिया पाही ।
जन्मले माझे कुळ आशेच सर्वही ।।२।।
असाच हा जन्म पाठी मागा गेला ।
पुन्हा नाही आला कदा काळी ।।३।।
संतु म्हणे वनमाळी ।
चुकवा जन्माची हे पाळी ।।४।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा उपदेश मानवी जीवनातील काळाचे मूल्य आणि विरक्तीचे महत्त्व अत्यंत परखडपणे मांडतो. मानवी देह हा अनेक जन्मांच्या पुण्याईने मिळतो, परंतु संसारातील मोहापायी माणूस हा अमूल्य ठेवा नश्वर गोष्टींमध्ये वाया घालवतो, याविषयी ते साधकाला सावध करतात.

अभंग क्र. ९

सगुण हा घाणा घेऊनि बैसलो ।
तेली जन्मा आलो घाणा घ्याया ।।१।।
नाही तर तुमची आमची एक जात ।
कमी नाही त्यात आणु रेणु ।।२।।
संतु म्हणे जाती दोनच त्या आहे ।
स्त्री आणि पुरुष शोधुनिया पाहे ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार वारकरी चळवळीतील सामाजिक समता आणि मानवतावादी तत्त्वज्ञानाचा गाभा स्पष्ट करतो. समाजाने निर्माण केलेल्या कृत्रिम उतरंडीला छेद देऊन ते निसर्गसिद्ध आणि आध्यात्मिक सत्य समोर ठेवतात.

अभंग क्र. १०

आमुचा तो घाणा त्रिगुण तिळाचा ।
नंदी जोडियला मन पवनाचा ।।१।।
भक्ति हो भावाची लाट टाकियली ।
शांती शिळा ठेवीली विवेकावरी ।।२।।
सुबुध्दीची वढ लावोनी विवेकांस ।
प्रपंच जोखड खांदी घेतीयले ।।३।।
फेरे फिरो दिले जन्मवरी ।
तेल काढियले चैतन्य ते ।।४।।
संतु म्हणे मी हे तेल काढियले ।
म्हणुनी नांव दिल संतु तेली ।।५।।

भावानुवाद : संत साहित्यात लौकिक व्यवसायातील साधनांचे आध्यात्मिक रूपकात रूपांतर करण्याची समृद्ध परंपरा आहे, आणि संत संताजी जगनाडे महाराजांचा 'तेलाचा घाणा' हे त्याचे एक अद्वितीय व परिपूर्ण उदाहरण आहे. रोजच्या उपजीविकेचे साधन असलेल्या घाण्याला त्यांनी थेट आत्मसाधनेची प्रयोगशाळा बनवले.

अभंग क्र. ११

देह क्षेत्र घाणा ऐका त्याच्या खुणा ।
गुदस्थान जाणा उखळ ते ।।१।।
स्वाधिष्टानावरी मन पुरचक्र ।
विदुं दंत चक्र आनु हात ।।२।।
एकविस मनी खांब जो रोविला ।
सुतार तो भला विश्वकर्मा ।।३।।
मनाशी जुपंले फेरे खाऊ दिले ।
तेल हाता आले सुटे मन ।।४।।
संतु म्हणे माझा घाणा हो देहांत ।
चालवि आपोआप पांडुरगं ।।५।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांनी 'देहरूपी घाणा' या संकल्पनेतून शरीर, मन आणि कर्माची जी तात्त्विक रचना उलगडली आहे, ती वारकरी साहित्यातील रूपक परंपरेची एक उत्कृष्ट निर्मिती मानली जाते. घाण्याच्या प्रत्येक घटकाला मानवी शरीराच्या व मनाच्या सूक्ष्म क्रियांची जोड देऊन ते सर्व क्रियांमागचा अंतिम सूत्रधार पांडुरंग कसा आहे, हे स्पष्ट करतात.

अभंग क्र. १२

निंदक हा घाणा म्हणावा तो जरी ।
विवाहा भितरी फिरे कैसा ।।१।।

ब्राम्हण पुरोहित आणिक ते जोशी ।
भरा आधी घाणा म्हणती सर्वाशी ।।२।।
भरल्यावांचुनी कार्य सिध्दी नाही ।
शोधुनिया पाही संतु म्हणे ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार वारकरी संप्रदायातील 'कर्तव्यनिष्ठा आणि वास्तववादी जीवनदृष्टी' अधोरेखित करतो. अध्यात्म म्हणजे व्यावहारिक जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करणे किंवा कर्मापासून पळ काढणे नव्हे, तर संसारात राहून आपली कर्तव्ये अत्यंत काटेकोरपणे व प्रामाणिकपणे पार पाडणे होय, हा मोलाचा संदेश यातून मिळतो.

अभंग क्र. १३

निदंक हा घाणा म्हणावा तो जरी ।
शुभ कार्या आधिं भरतात ।।१।।
श्रीकृष्णाचे लग्नी भरीयला घाणा ।
म्हणवेना कोणा निंदक तो ।।२।।
संतु म्हणे म्या तो घाणा भरियला ।
सिध्दीस तो नेला पांडुरंगे ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार वारकरी परंपरेतील 'मंगलाचरण आणि श्रद्धाधिष्ठित आरंभ' या मूल्याची

प्रतिष्ठापना करतो. कोणत्याही लौकिक वा अलौकिक कार्याचा पाया जर शुद्ध श्रद्धा आणि ईश्वरी अनुसंधानावर रचला असेल, तर त्या कार्यात निर्विघ्नता आणि यश निश्चित लाभते, असा संताजींचा दृढ विश्वास आहे.

अभंग क्र. १४

आणिक तो घाणा कोणता सादर ।
सोहं ब्रम्हध्वनी अनुहात गजर ।।१।।
ब्रह्मांड शिखरी ठोक वाजे ।
दशनाथ होती सर्वांचे ब्रह्मांडी ।।२।।
संतु म्हणे हा तो देवा घराचा घाणा ।
सदगुरु वांचोनी कळेनाच कोणा ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार वारकरी संप्रदायातील 'अनुभूतीसंपन्न ज्ञान आणि सद्गुरुकृपा' या अद्वैत तत्त्वाचा गाभा स्पष्ट करतो. 'सोऽहं' (ते परब्रह्म मीच आहे) हे केवळ उच्चारण्याचे अक्षर नसून, श्वासागणिक घडणारी ती अत्यंत सूक्ष्म आंतरिक अनुभूती आहे, जी सद्गुरूंच्या मार्गदर्शनाशिवाय उमजणे अशक्य आहे.

अभंग क्र. १५

घाण्याचा कर करा पुसलासी मज ।
तरी तुकयाचा गुज सांगू आता ।।१।।
दशनाद होती सर्वांचे ब्रह्मांडी ।
तुझे काय पिँडी वाजताती ।।२।।
संतु म्हणे घाण्याचा करकरा ।
दशनादाचा तो खरा जगा माजी ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांनी घाण्याच्या 'करकर' आवाजाला 'अनाहत नाद' आणि आंतरिक नादब्रह्माशी जोडणे, हा त्यांच्या गूढ व अनुभवाधिष्ठित साहित्यातील अत्यंत विलक्षण विचार आहे. लौकिक कानांना कर्कश किंवा सामान्य वाटणारा घाण्याचा आवाज संताजींच्या आध्यात्मिक श्रवणेंद्रियांना थेट विश्वाच्या मूळ कंपनाशी (नादब्रह्माशी) एकरूप करतो.

अभंग क्र. १६

आशा मनशा तृषा माया पाचरी चारी आणून ।
दुर्गतीचा खील त्यामधी दीला ठोकून ।।१।।
त्याच्या योगे चारी पाचरी आल्या आवळून ।
सरकायासी जागा नाही मुळापासून ।।२।।

संतु म्हणे ह्या घाण्याच्या पाचरी ।
जग भुलव्या नारी खऱ्याच ह्या ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा उपदेश मानवी मनाच्या मानसिक व आध्यात्मिक गुलामगिरीवर नेमके बोट ठेवतो. संसारातील बाह्य परिस्थिती माणसाला जेवढे जखडत नाही, तेवढे माणसाचे स्वतःचे आंतरिक विकार आशा, इच्छा, तृष्णा आणि माया त्याला जन्म-मरणाच्या आणि दु:खाच्या पाशात घट्ट बांधून ठेवतात.

अभंग क्र. १७

भुलविले ह्यांनी भस्मासुर दैत्याशी ।
आणिक नारदाशी त्याच रीती ।।१।।
ब्रह्मदेवा आणि विश्वाही मित्राशी ।
तसेच भुलविले इंद्रा आणि चंद्राशी ।।२।।
संतु म्हणे अशा ह्या घाण्याच्या पाचरी ।
काढाव्या वेगशी देहातुनी ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा इशारा मायेच्या दुर्लंघ्य सामर्थ्यावर आणि माणसाच्या अहंकारावर अत्यंत भेदक प्रकाश टाकतो. अनेकदा माणसाला आपल्या ज्ञानाचा, तपश्चर्येचा किंवा सामर्थ्याचा गर्व होतो; परंतु संताजी महाराज स्पष्ट करतात

की, जोपर्यंत मनात सूक्ष्म वासना आणि तृष्णा शिल्लक आहे, तोपर्यंत मायेचे जाळे कोणालाही सोडत नाही.

अभंग क्र. १८

हरिचंद्रराजाने पाचरी ओळखिल्या ।
हाकलुनि दिल्या घरातुनी ।। १ ।।
अशा ह्या पाचरी ओळखिल्या कोणी ।
गोरोबानी आणि तुकारामजिनी ।।२।।
संतु म्हणे माझ्या घाण्याच्या पाचरी ।
सद्गुरुवांचोनी ओळखिना कोणी ।।३।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार साधनेतील एका अत्यंत मूलभूत वास्तवावर बोट ठेवतो: "बंधन ओळखणे, हीच मुक्तीची पहिली पायरी आहे." सामान्यतः माणूस मायेच्या पाशात जखडलेला असूनही स्वतःला स्वतंत्र आणि सुखी मानत असतो. जोपर्यंत रोगाचे निदान होत नाही, तोपर्यंत त्यावर उपचार करता येत नाहीत; तसेच जोपर्यंत मायेचे जाळे ओळखता येत नाही, तोपर्यंत त्यातून सुटका अशक्य असते.

अभंग क्र. १९

पाचरीनी प्रताप दाखविला शंकरा ।
भुलवोनी गेला भिल्लीनीशी ।। १ ।।
विश्वामित्रासी रंभेने कुत्रा बनविला।
मागे मागे नेला घराप्रती ।।२।।
संतु म्हणे अशा घाण्याच्या पाचरी ।
दाखविल्या चारी सद्गुरुजिनी ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार साधनेतील एका अपरिहार्य सत्यावर प्रकाश टाकतो: मायेचे सामर्थ्य आणि सद्गुरुकृपेचे अद्वितीयत्व. माणसाला आपल्या बुद्धीचा, तपाचा किंवा लौकिक पराक्रमाचा कितीही अहंकार असला, तरी सूक्ष्म मोहाचे एक लहानसे जाळेही त्याला सहज अडकवून ठेवू शकते.

अभंग क्र. २०

सद्गुरुवाचोनी दाखविना कोणी ।
संसार मोहनी पडली असे ।। १ ।।
संसार करुनि पाचरी ओळखिल्या ।
उध्दरुनि नेल्या तुकोबाने ।।२।।
संतु म्हणे माझ्या सद्गुरुच्या कृपेने ।
पाचरी बसविल्या घाण्यामाजी ।।३।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार वारकरी संप्रदायातील 'सद्गुरूकृपा आणि आत्मजागृती' या तत्त्वाचे मर्म अत्यंत समर्पकपणे स्पष्ट करतो. मायेचे पाश इतके सूक्ष्म आणि मोहक असतात की, माणूस स्वतःहून त्या बंधनांचा वेध घेऊ शकत नाही; तिथे सद्गुरूंचा ज्ञानरूपी स्पर्शच अंतःकरणातील अज्ञानाचा पडदा दूर करू शकतो.

अभंग क्र. २१

मनोभक्तीची करुनी लाठ ।
गुरुकृपेचा बसविला कठ ।।१।।
आगांवरि घेऊनि नेट । दाखवि ।
दाखवि वैकुंठीची वाट ।।२।।
अशी ही संतु तेल्याची लाट ।
कळिकाळाची .... फाट ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार वारकरी परंपरेतील 'दृढ भक्ती, सद्गुरुकृपा आणि जीवनमुक्ती' या सिद्धांताची फलश्रुती स्पष्ट करतो. मानवी जीवन हे संकटे, प्रतिकूलता आणि दुःखांनी भरलेले आहे; परंतु ज्याच्या अंतःकरणात ईश्वराविषयीची अढळ निष्ठा आणि शिरावर सद्गुरूंचा वरदहस्त असतो, त्याला संसारातील कोणतीही वादळे विचलित करू शकत नाहीत.

अभंग क्र. २२

लाट उचलली जगामधी कोणी ।
मार्कँड ऋषिनी आणि विदुरानी ।।१।।
वाल्मीकानी आणि शवरिनी ।
अर्जुनानी आणिक सुदामानी ।।२।।
लाट उचलली भक्तीची ।
संतु तेल्याचे मुक्तिची ।।३।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार वारकरी परंपरेतील 'भक्तिमार्गाचे सार्वभौमत्व आणि सर्वसमावेशकता' यांचे अत्यंत प्रभावी दर्शन घडवतो. वारकरी संप्रदायाचा मूळ पायाच हा आहे की, ईश्वरप्राप्तीसाठी उच्च कुल, क्लिष्ट योगसाधना, कठोर तप किंवा पांडित्याची अट नसते; तिथे केवळ निखळ, अनन्य भक्तीच जिवाला थेट मुक्तीच्या शिखरावर पोहोचवते.

अभंग क्र. २३

संतु तेलियाचे घाण्याची ती लाट ।
उचलितो कोण देउनिया नेट ।।१।।
नेट तो दिधला लंकेचे रावणे ।
उचलेना तेने कदापिहि ।।२।।

संतु म्हणे माझे घाण्याची ती लाट ।
सुदामा उचली तेव्हांच ती ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांनी तेलाच्या घाण्याच्या रूपकातून मांडलेले हे तत्त्वज्ञान वारकरी संप्रदायातील 'निरहंकार भक्ती' या संकल्पनेचा गाभा स्पष्ट करते. भौतिक ताकद, बुद्धिमत्ता किंवा बाह्य सामर्थ्य हे परमार्थाच्या वाटेवर अनेकदा अहंकाराला जन्म देतात; परंतु जोपर्यंत हा अहंकार पूर्णपणे चक्काचूर होत नाही, तोपर्यंत आत्मिक तेजाचा प्रकाश पडत नाही, हे ते घाण्याच्या क्रियेतून थेट दाखवून देतात.

अभंग क्र. २४

सुदामाशी शक्ति काहीच नव्हती ।
रावणाशी होती पुष्कळच ती ।।१।।
रावणा उचलेना सुदामा उचली ।
मती गुंग झाली रावणाची ।।२।।
संतु तेली म्हणे सद्गुरुवाचोनी ।
लाट ही उचलेना कदाकाळी ।।३।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार भौतिक सामर्थ्याचा अहंकार आणि भक्तीचे अगाध सामर्थ्य यांमधील भेद अत्यंत प्रभावी पौराणिक दाखल्यांतून स्पष्ट करतो. बाह्य सत्ता,

संपत्ती किंवा शारीरिक बळ माणसाला क्षणिक विजय मिळवून देऊ शकते; परंतु शाश्वत कल्याण आणि ईश्वराचे सान्निध्य केवळ निर्मळ भक्ती व सद्गुरुकृपेनेच साध्य होते.

अभंग क्र. २५

लाठ माझी माता लाठ माझा पिता ।
लाठी विना कांता विद्रुपची ।।१।।
लाठी हीने मजला दिधली ती लाट ।
चुकवीली वाट जन्ममरणाची ।।२।।
संतु म्हणे उचला घाण्याची ती लाट ।
व्यर्थची खटपट करु नका ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार वारकरी संप्रदायातील 'सर्वभावे शरणागती आणि भक्तीचे अढळ नातं' अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत मांडतो. लौकिक संसारात रक्ताची नाती, संपत्ती किंवा प्रतिष्ठा ही अखेर नश्वर आणि मर्यादित स्वरूपाची असतात; मात्र भगवंताची भक्ती हीच जिवाची खरी माता, पिता, सखा आणि अंतिम आधार ठरते.

अभंग क्र. २६

मन मोहाची करुनि खुटी ।
लाठीस ठोकली बळकटी ।।१।।
फिरे गरगरा लाठी भोवताली ।
ध्यान जाईना लाठीवरी ।।२।।
संतु म्हणे माझ्या घाण्याची ती खुटी ।
पहा उठाउठी अगोदर ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांनी येथे वापरलेले 'मोहाची खुटी उपटून भक्तीत मन रोवणे' हे रूपक वारकरी परंपरेतील मनःसंयम आणि आंतरिक स्थिरतेचे अत्यंत प्रभावी दर्शन घडवते. ग्रामीण व व्यावसायिक जीवनातील अत्यंत साध्या उदाहरणातून ते मनाच्या चंचलतेवर नियंत्रण मिळवण्याचा आणि आत्मचिंतनाचा मार्ग स्पष्ट करतात.

अभंग क्र. २७

खुटिनें प्रताप कोणास दाखविला ।
दशरथ राजाला आणि नारदाला ।।१।।
दशरथाचा अंत खुंटिनेच केला ।
नारद तो झाला नारदीच ।।२।।

संतु म्हणे अशीहि खुंटी ती मोलाची ।
विश्वाच्या तोलाची एकटीच ।।३।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांनी येथे 'मोह-मायेच्या खुंटीचे सामर्थ्य' स्पष्ट करताना मानवी मनाच्या अत्यंत सूक्ष्म आणि सार्वभौम दुर्बलतेवर अचूक बोट ठेवले आहे. ज्याप्रमाणे जमिनीत खोल रुतलेली खुंटी उपटणे महाकठीण असते, तसेच संसारातील मोह, ममता आणि वासना यांचे बंध इतके घट्ट असतात की, बाह्य सामर्थ्य किंवा तपश्चर्याही त्यांच्यापुढे अनेकदा निष्प्रभ ठरते.

अभंग क्र. २८

खुंटीने खुंटले घाने ते घ्यायाचे ।
मनी नाही आले अगोदर ।।१।।
आता तरी सावध व्हारे लवकरी ।
खुंटीविना घाणा घ्यावयाशी ।।२।।
संतु म्हणे माझे घाणे ते राहू द्या ।
खुंटिशी पाहु द्या अगोदर ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा इशारा साधनेतील 'पूर्वसावधता आणि आत्मजागृती' या मूल्याला अधोरेखित करतो. संसारातील मोहाचे पाश एकदा घट्ट आवळले की त्यातून

सुटणे महाकठीण होते; म्हणूनच संकट दाराशी येण्यापूर्वी किंवा मोहाने घेरण्यापूर्वीच त्याचे स्वरूप ओळखणे, हीच खरी प्रज्ञा आहे.

अभंग क्र. २९

खुंटिने प्रताप कैकईस दाखविला ।
वनवासा राम गेला गादी दिली भरताला ।।१।।
भरतानी त्याग केला पादुकास मान दिला ।
दु:खते होतसे कैकईच्या जिवाला ।।२।।
संतु म्हणे माझ्या घाण्याची ही खुंटी ।
केली तुटा तुटी मायलेका ।।३।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांनी येथे 'रामायण आणि कैकयीच्या मोहाचा' दिलेला दाखला मानवी नातेसंबंधांमधील आसक्ती आणि तिच्या विघातक परिणामांवर अत्यंत मार्मिक प्रकाश टाकतो. नाती ही प्रेमावर आधारलेली असली, तरी जेव्हा त्या प्रेमाची जागा 'स्वार्थ, संकुचित मोह आणि ममता' घेते, तेव्हा तीच नाती कुटुंबाच्या विनाशाला कारणीभूत ठरतात.

अभंग क्र. ३०

अशिया खुंटिला धरु नये हाती ।
करिल ती माती सर्वत्रांची ।।१।।
असेच खुंटिने गोपिचंदन फसविले ।
धातुचे पुतळे जळोनिया गेले ।।२।।
संतु म्हणे माझ्या घाण्याची ही खुटी ।
सद्गुरुवांचोनी सोडविना मिठी ।।३।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार साधनेतील एका अत्यंत कठोर वास्तवाकडे अंगुलिनिर्देश करतो: मायेच्या मोहाची मिठी ही केवळ तात्पुरती अडचण नसून संपूर्ण जीवनाची अपरिमित हानी करणारी ठरू शकते. मानवी जन्म हा आत्मोद्धारासाठी मिळालेली एक दुर्मिळ संधी आहे; परंतु मायेच्या फसव्या पाशात अडकून माणूस ही अमूल्य संधी व्यर्थ दवडतो.

अभंग क्र. ३१

मन झोंपेची करुनी शेंडी ।
लाठिच्या ठोकुनि तोंडी ।।१।।
काळ मोडुन टाकिल मुंडी ।
कितीहि आल्या झुंडीच्या झुंडी ।।२।।

सोडविना कोणी सद्गुरु वांचोनी ।
पहा तपासुनि संतु म्हणे ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार साधनेतील तीन अत्यंत बलवान घटकांवर—काळ (मृत्यू/वेळ), संकटे आणि मोह—विजय मिळवण्याचे आध्यात्मिक सूत्र स्पष्ट करतो. या तिन्हींची भीती आणि प्रभाव मानवी मनाला सतत अस्थिर ठेवत असतो; परंतु संताजी महाराज दाखवून देतात की, मनाचा संयम आणि सद्गुरुकृपा या दोन घटकांच्या बळावर या सर्वांवर सहज मात करता येते.

अभंग क्र. ३२

शौंडिच्या नादांने किती ते फसले ।
फसले अवघे जन त्रैलोकींचे ।।१।।
तुका वाणी याने शौंडिशी बांधले ।
कधी नाही भ्याले रात्रंदिन ।।२।।
संतु म्हणे ऐशी शौंडि ती बांधावी ।
जोड ती करावी विठ्ठलाची ।।३।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार वारकरी संप्रदायातील 'दंभमुक्ती आणि आंतरिक भावनिष्ठा' या पायाभूत तत्त्वावर अत्यंत अचूक प्रकाश टाकतो. अध्यात्माच्या क्षेत्रात बाह्य

अवडंबर, कर्मकांडाचा दिखावा किंवा वेशभूषा यांपेक्षा अंतःकरणातील शुद्ध भाव आणि नामाचे अखंड अनुसंधान किती श्रेष्ठ आहे, हे ते अत्यंत साध्या ग्रामीण रूपकातून स्पष्ट करतात.

अभंग क्र. ३३

आणिक ते शेंडी उभी हो कोणाची ।
नारद मुनिची असेच कीं ।।१।।
जेव्हा कोंठे कांही कळहि मिळेना ।
तेव्हां ती कडाडे आपोआप ।।२।।
संतु म्हणे अशी शेंडी ज्याची आहे ।
शरण त्यांनी जावे सद् गुरूसी ।।३।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार मानवी जीवनातील अपरिहार्य संकटे आणि त्यातून तरून जाण्यासाठी 'सद्गुरुकृपेचे अद्वितीय महत्त्व' अधोरेखित करतो. संकटकाळात माणसाची बुद्धी अनेकदा हतबल होते, निर्णयक्षमता मंदावते आणि चित्त भयाने ग्रासले जाते. अशा कसोटीच्या क्षणी केवळ सद्गुरूंचा आधारच माणसाला योग्य दिशा दाखवू शकतो.

अभंग क्र. ३४

आणिक शेँडीने फसविलेँ कोणा ।
रावणाच्या भावा कुंभकर्णा ।।
कुंभकर्णाशीँ होती झोँप फार ।
तेणेँ तो आहार फार करी ।।
संतु म्हणे शेंडी नसावीँ बा अशी ।
कुळक्षय लाशी आपोआप ।।

भावानुवाद : संताजी जगनाडे महाराजांचा हा उपदेश मानवी मनाच्या तामसिक दोषांवर आणि आत्मिक अधोगतीच्या कारणांवर अत्यंत भेदक प्रहार करतो. परमार्थाच्या वाटेवर केवळ बाह्य संकटेच अडथळा ठरत नाहीत, तर माणसाच्या स्वतःच्या देहातील आणि मनातील दुर्गुण—आळस, प्रमाद (निद्रा) आणि अनिर्बंध अतिरेक—त्याला प्रगतीपासून रोखून विनाशाकडे ढकलतात.

अभंग क्र. ३५

झोँपेँत असतांना दिले दान ।
राजा हरिचंद्राने साडे तीन भार ।।
भार सुवर्ण होईना तेँ पुरे ।
पुरे सर्व देऊन घेतलेँ स्वतःस विकून।।

संतु तेली म्हणे हो म्हणेही झोँप ।
हिचा सर्वाहीँ करा करा कोप।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांनी 'राजा हरिश्चंद्राचे उदाहरण' देऊन अज्ञानाची झोप, प्रमाद आणि मोहाच्या भुलभुलैय्याविरुद्ध अत्यंत प्रभावी इशारा दिला आहे. राजा हरिश्चंद्राचे जीवन हे केवळ सत्यनिष्ठेचेच नव्हे, तर संकटांच्या आणि मोहाच्या क्षणीही आत्मजागृती कशी टिकवून ठेवावी, याचा ज्वलंत आदर्श आहे.

अभंग क्र. ३६

मनो सुविचारी करुनि कातर ।
शेँडिस टांगली वर हो शेंडीस टांगली वर।।
लाटिचा आधार तिला फार हो लाठि ।
फिरे गरगरा जोरानेँ हो फिरे गरागरा ।।
मन पवन चाले तोऱ्यानेँ हो मन पवन चालेँ ।
संतु म्हणे हो म्हणे ही कातर हो ।
धरावी ध्यानीँ ध्यानी सर्वाँनी।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार वारकरी संप्रदायातील 'ज्ञानयुक्त भक्ती आणि अष्टांगयोगाचा समन्वय' अत्यंत प्रभावीपणे स्पष्ट करतो. भक्ती म्हणजे केवळ

भावविवशता किंवा आंधळेपण नव्हे, तर ती विवेक आणि मन-प्राणाच्या संयमावर अधिष्ठित असलेली एक अत्यंत सूक्ष्म आंतरिक प्रक्रिया आहे, हे संताजी महाराज अधोरेखित करतात.

अभंग क्र. ३७

कातरिनेँ कातरला दुष्टांचा तो गळा ।
सावत्याचा मळा सांभाळला।।
कातरीने कातरला रावणाचा मळा ।
लंकेचा डोँबाळा तिनेँ केला ।।
संतु म्हणे कातर आणिल जो ध्यानीँ ।
आवडेल तो प्राणी सर्व जगा ।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांनी येथे 'विवेकाची कातरी' हे अत्यंत समर्पक आणि व्यवहारातील रूपक वापरून अंतःकरणशुद्धीची प्रक्रिया स्पष्ट केली आहे. ज्याप्रमाणे शिंपी कापडातील निरुपयोगी, फाटका किंवा नको असलेला भाग कातरीने अचूकपणे कापून टाकतो आणि त्यातून एक सुंदर वस्त्र साकारतो; त्याचप्रमाणे साधकाने विवेकाच्या साहाय्याने मनातील दोष छाटून टाकले पाहिजेत, हा या विचाराचा गाभा आहे.

अभंग क्र. ३८

कातरीनेँ कातरला दु:शासन कौरव ।
आणिक भस्मासुर भस्म केला ।।
आणिक कातर चालली ती कशी ।
अहि महि लंकेशीं बळी दिले ।।
संतु म्हणे कातर ज्याचेँ देहीँ आहे ।
त्याची चक्रपाणी वाट पाहे।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार साधनेतील 'शुद्धीकरण आणि भगवत्कृपेची प्राप्ती' यांमधील कार्यकारणभाव अत्यंत प्रभावीपणे उलगडून दाखवतो. जोपर्यंत अंत:करणातील कचरा बाहेर काढला जात नाही, तोपर्यंत तिथे ईश्वराचे अधिष्ठान स्थिर होऊ शकत नाही; म्हणूनच संताजी महाराज विवेकाच्या कृतीला पांडुरंगाच्या अहेतुक कृपेशी थेट जोडतात.

अभंग क्र. ३९

कातरीधेँ धरियले पांची पांडवाशीँ ।
सोडुनिया दिले लाक्षागृहीँ ।।
आणिक शत्रुध्न भरत धरियला ।
सोडुनियां दिला अश्वमेधीँ ।।

संतु म्हणे कातर ज्यांनी ओळखिली ।
मोडोनिया गेली आपोआप ।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार साधनेतील एका अत्यंत सूक्ष्म मानसशास्त्रीय व तात्त्विक नियमावर प्रकाश टाकतो: "मायेचे बंधन सत्य नसून केवळ भ्रामक आहे; त्यामुळे त्याची खरी ओळख पटणे, हाच त्या बंधनाचा अंत ठरतो." अंधारात दोरीला साप समजून निर्माण झालेली भीती केवळ दिव्याचा प्रकाश पडताच जशी नाहीशी होते, तसाच अनुभव मायेच्या कातरीबाबत येतो.

अभंग क्र. ४०

कातर मोडली कोणाचिये हाते ।
तारामती आणि हरिचंद्र मते ।।
तशीच कातर कोणी ते मोडली ।
आनुसया आणि सती सावित्रीनी ।।
संतु म्हणे माझे घाण्याची कातर ।
फिरे निरंतर सर्वा देहीँ ।।

भावानुवाद : संत संताजी जगनाडे महाराजांचा हा विचार साधनेतील एका अत्यंत मूलभूत आणि क्रांतिकारक सत्यावर बोट ठेवतो: "विवेकाची कातरी ही बाहेरून आणायची कोणतीही गोष्ट

नसून, ती प्रत्येकाच्या अंतर्यामी निसर्गतःच निरंतर कार्यरत असलेली आत्मिक शक्ती आहे." अडचण साधना नसण्यात नाही, तर तिच्या अस्तित्वाची विस्मृती होण्यात आहे; म्हणूनच केवळ तिची जाणीव (स्मरण) जागृत करणे हाच मुक्तीचा खरा मार्ग ठरतो.

अभंग क्र. ४१

मन शांतिची करुनी शिळ ।
तिजवर बसलेँ माझेँ कुळ ।।
तिच जन्म मरणाचे मुळ ।
असेँ माझेँ सांगणे समुळ।।
संतु म्हणे ही शिळ जेथेँ आहे ।
तेथेँ यम पाश उभा राहे ।।

